2018-19

# लिंग समभाव आणि महिला सक्षमीकरण




मुख्य संपादक
प्राचार्य डॉ. अशोक खैरनार

संपादक
प्रा. कांतीलाल सोनवणे
प्रा. अतिष मेश्राम
डॉ. प्रियंका सुलाखे



अथर्व पब्लिकेशन्स

- साहित्यातील समाजसुधारकांचा स्त्री विषयक विचार.......... ७९
  – प्रा.डॉ. संजय राजधर महाले
- स्वयंसहाय्यता बचतगट आणि महिला सक्षमीकरण........... ८४
  – डॉ. संभाजी पाटील
- महिला सबलीकरण आणि स्त्री जीवन ...................... ९०
  – प्रा. नाईक पी.एन.
- राष्ट्रीय विकास आणि महिला सक्षमीकरण .................... ९२
  – प्रा. सुरेश रमण देसले
- भारतातील आर्थिक नियोजन आणि स्त्री सक्षमीकरण ........ ९७
  – प्रा. श्रीमती नेरे अरुणा विजयकुमार
- जात, लिंगभाव आणि हिंसाचार ............................ १०२
  – प्रा. गजेंद्र सोमा जगदेव
- श्रीमती इंदिरा गांधी ...................................... १०७
  : भारताच्या प्रभावशाली महिला पंतप्रधान
  – प्रा. शरद बाबुराव सोनवणे
- महिला सबलीकरण आणि सामाजिक स्थित्यंतरण .......... ११३
  – प्रा. दत्तात्रय प्रभूराव मुंढे
- गीता साने यांच्या 'हिरवळीखाली' ......................... ११६
  या कादंबरीमधील स्त्री चित्रण
  – प्रा. मिलिंदकुमार भिकाजी देवरे
- निवडक दलित कथेतील स्त्री दर्शन.......................... १२१
  – प्रा. अरुण डी. मोरे
- 'कुलवधु'चे कथानक व सामाजिक स्थिती ................. १२५
  – प्रा. निलेश एकनाथ पाटील
- महिलांचे घटनात्मक व कायदेशीर अधिकार ................ १३३
  – प्रा.डॉ. राजू परभत निकम
- महिला सक्षमीकरण आणि महिलांचा राजकीय सहभाग ..... १४०
  – प्रा. रमेश एकनाथ भारुडकर
  – प्रा. गजानन भिकाजी फुलसावंगे

# महिला सक्षमीकरण आणि महिलांचा राजकीय सहभाग

– प्रा. रमेश एकनाथ भारुडकर
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आष्टी, ता. आष्टी. जि. बीड
– प्रा. गजानन भिकाजी फुलसावंगे
जनता शिक्षक प्रसारक मंडळ महिला कला महाविद्यालय, औरंगाबाद

**प्रस्तावना**

जागतिक लोकसंख्येमध्ये महिलांचे प्रमाण ५० टक्के एवढे आहे. त्यामुळे एकूण लोकसंख्या व मानवी विकास यांचा विचार केला असता महिलांचा विचार करणे अपरिहार्य ठरते. परंतु पुरुषांच्या तुलनेत महिलांचे सक्षमीकरण कितपत झालेले आहे? या प्रश्नाचे उत्तर शोधताना वेगवेगळे पैलू आपल्या डोळ्यांसमोर येतात, यापैकी एक पैलू म्हणजे महिलांचा राजकीय क्षेत्रातील सहभाग व त्याद्वारे साधलेले सक्षमीकरण होय. जगातील एकूण संसद सदस्यांमध्ये ३१ टक्के महिला सदस्य आहेत, त्यामधील २३ टक्के महिला राज्य किंवा राष्ट्रीय प्रमुख म्हणुन कार्यरत आहेत. जगामध्ये अस्तित्वात असलेल्या एकुण बुद्धिमान महिलांपैकी नेतृत्व करणाऱ्या महिलांची संख्या अतिशय कमी आहे. त्याला कारणीभूत असणारे घटक सामाजिक, आर्थिक व शारीरिक आहेत. प्रामुख्याने महिला वर्तनाच्या समाजाकडून असणाऱ्या अपेक्षांचा सुद्धा त्यामध्ये समावेश आहे.

भारतीय राजकारणातील महिलांची सद्य:स्थिती तशी बऱ्यापैकी उंचावलेली आहे व नेहरुंनी म्हटल्याप्रमाणे, 'स्थानिक स्वराज्य संस्था या लोकशाहीचा आधार आहे'; त्यामध्ये महिलांचा सहभाग वाढला पाहिजे हे त्यांनी ओळखले होते म्हणुन खऱ्या अर्थाने समाज व राष्ट्राचा विकास करावयाचा असेल तर महिलांचे सक्षमीकरण झाले पाहिजे, महिलांना जागृत केले पाहिजे, असे ते म्हणत. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये महिला सक्षमीकरण आणि महिलांचा राजकारणातील सहभाग याचा आढावा घेण्यात आला आहे.

**महिलांचा राजकारणातील सहभाग**

भारतात राजकारणाच्या दृष्टीने महिला हा ५० टक्के मतदान असलेला प्रभावी घटक आहे. त्यासाठी भारतातील कोणताही राजकीय पक्ष राजकारणातील महिलांचे महत्त्व दुर्लक्षित करुन राजकारण करु शकत नाही किंवा टाळू शकत नाही. माजी पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी, माजी राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील, सुषमा स्वराज यांच्या राजकारणातील प्रभावामुळे महिला राजकारणाचा नवा अध्याय भारतीय राजकारणात निर्माण झाला. महिलांच्या महत्त्वाकांक्षा वाढल्या आहेत. त्यामुळे अनेक राजकीय पक्षांनी महिला आघाड्या बनवून

महिलांना आपल्या पक्षाकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न केला आहे.

**राष्ट्रीय स्तरावरील राजकारणामुळे महिलांची स्थिती**

भारतीय राजकारणाचा आढावा घेतला असता असे लक्षात येते की, राष्ट्रीय स्तरावरील राजकारणामध्ये महिला सहभागी होत होत्या, पण त्यांची संख्या अगदी बोटावर मोजण्याइतकी असायची. स्वातंत्र्यानंतर भारताने संविधान स्विकारले, स्त्री-पुरुष समानतेचे तत्व स्विकारले तेव्हा महिलांनी स्थानिक, राज्य आणि राजकीय पातळीवर सहभाग नोंदविणे सुरु केले.

**राजकारणातील महिलांच्या सहभागाची कारणे –** १) कौटुंबिक पाठींबा, वडिल, पती, पुत्र यांचा राजकारणातील वावर. २) श्रीमंत व शैक्षणिक पार्श्वभूमी असणाऱ्या महिला. ३) आरक्षणाचा फायदा. ४) स्वयंप्रेरणेने सहभागी होणाऱ्या महिला. यामध्ये वरीलपैकी तीन कारणे हे इतरांच्या सहकार्याने महिलांना झालेले राजकारणाचे लाभ आहेत. तर स्वयंप्रेरणेने आणि स्वत:च्या कर्तृत्वाने राजकारणात आलेल्याची संख्या अतिशय कमी आहे.

**भारतीय संसदेतील लोकसभा व राज्यसभेतील महिलांचा सहभाग**

लोकसभा आणि राज्यसभेमध्ये महिलांचे प्रमाण अल्प प्रमाणात वाढत आहे. ३३ टक्के आरक्षण असूनसुद्धा एकुण निवडणुकांमधील लोकसभा व राज्यसभेची सरासरी ६.५९ व ९.१५ टक्के एवढीच येते. यावरुन महिलांचा राजकीय सहभाग वाढणे आवश्यक आहे.

**राजकीय सहभागातून महिला सक्षमीकरण**

भारतीय महिला अनेक बंधनाच्या जोखडात पिढ्यान् पिढ्या अडकली आहे. महिला सक्षमीकरणासाठी शाश्वत प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यामुळे महिलांच्या हितरक्षणासाठी राजकीय सत्तेत महिलांचा सहभाग असणे गरजेचे आहे. त्यातूनच महिलांच्या समस्या, व्यक्तिमत्व यात सकारात्मक बदल करण्यास महिला स्वत: सक्षम होतील. १९९३ व १९९४ ला महिलांना स्थानिक स्वराज्य संस्था व पंचायतराज व्यवस्था यामध्ये राखीव जागा ठेवण्यासाठी ७३ वी व ७४ वी घटनादुरुस्ती करण्यात आली. त्यामुळे महिलांना प्रत्यक्ष राजकारणात सहभागाची कायदेशीर संधी प्राप्त झाली त्यातून विशेषत: ग्रामीण महिलांच्या जीवनात नवचैतन्य निर्माण झाले.

आज संपुर्ण भारतात २,२५,२०० ग्रामपंचायती आहेत, त्यात एकूण २२,५०,००० सदस्य संख्या आहे, त्यापैकी ७,५०,००० महिला सदस्य आहेत तर ७५,००० सरपंच आहेत. भारतात पंचायत समित्यांमध्ये एकुण १७,००० महिला प्रतिनिधी आहेत. तर जिल्हा परिषदेत १,५८३ महिला प्रतिनिधी आहेत. जिल्हा परिषद अध्यक्षा १५८ महिला आहेत. एवढ्या मोठ्या संख्येने स्थानिक

स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून महिलांना आपले चूल व मूल, घराच्या चार भिंती पलीकडील जग महिला आरक्षणामुळे शक्य झाले आहे. त्यातून महिलांमध्ये आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय सक्षमीकरण होताना दिसत आहे.

**महिलांमध्ये राजकीय अधिकाराची जागृती**

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून महिलांना सक्षम बनविण्यास सुवर्ण संधी प्राप्त झाली आहे. भारतात महिलांच्या नावे अनेक मोठमोठ्या कौतुकाच्या परंपरा निर्माण केल्या आहेत. परंतु प्रत्यक्ष वास्तविक अधिकार देण्याची जेव्हा वेळ येते तेव्हा पुरुषाचा अहंकार जागृत होतो. म्हणून महिलांच्या अनेक अधिकारांचा वापर त्यांचे पती, भाऊ इ. कुटुंबातील व्यक्ती करत असतात. करिता महिलांच्या अधिकाराविषयी सार्वजनिक जनजागृती होणे गरजेचे आहे. त्यासाठी महिलांमध्ये राजकीय जागृती निर्माण करुन अधिकारांच्या अंमलबजावणीसाठी सक्षम यंत्रणा निर्माण करणे हे महिलांच्या सक्षमीकरणास हातभार लागू शकेल. सामाजिक, धार्मिक, जातीय बंधनामुळे महिला आपला स्वतंत्रपणे विचार करु शकत नाहीत. त्यांचे स्वतंत्र व्यक्तिमत्व निर्माण होण्यास घटनेने दिलेले कायदेशीर अधिकार ज्ञात होणे अत्यंत आवश्यक आहे.

**सारांश**

आधुनिक काळात महिला सक्षमीकरणाची गरज निर्माण झाली आहे. परिणामी समाजातील मोठा घटक आपल्या अधिकारांपासून वंचित राहता कामा नये. राजकीय अधिकार प्राप्त महिलांमध्ये आपल्या अधिकारांची जाणीव निर्माण होणे काळाची गरज आहे. नसता महिलांच्या राजकीय आरक्षणाचा मूळ उद्देश सफल होणार नाही. देशात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून महिलांना राखीव जागा तर मिळाल्या परंतु त्यांच्या अधिकारांचा वापर त्यांनी स्वतःच्या सदसद्विवेक बुद्धीने करावा अशी सामाजिक, राजकीय परिस्थिती निर्माण करणे महिलांच्या राजकारणातील सक्षमीकरणास साहाय्यभुत ठरेल.

**संदर्भसूची**

१. डॉ.बी.एस. वाघमारे, 'मानवसंसाधन विकास आणि मानवाधिकार', पिअरसन प्रकाशन, नवी दिल्ली २०१४.

२. डॉ. शुभांगी गोटे गव्हाणे, 'महिला सबलीकरण : स्वरुप व समस्या', वरद पब्लिकेशन औरंगाबाद २००४.

३. डॉ. दिपाली सक्सेना, 'महिला सशक्तीकरण : सिद्धांत और वास्तविकता', रोशनी प्रकाशन, कानपूर २०१२.

४. निधी भारद्वाज, 'महिला सबलीकरण', सागर पब्लिकेशन, जयपूर २०१२.

MAHARASHTRA STATE COMMISSION FOR WOMEN, MUMBAI

Sponsored

One Day National Level Seminar on

# Gender Equality and Women Empowerment

on 20 October, 2018

Organized by

Nijampur-Jaitane Shikshan Prasarak Mandal's

## Adarsh College of Arts

Nijampur-Jaitane, Tal. Sakri, Dist. Dhule (MS) - 424305

NAAC Reaccredited

|| स्त्रीशक्तिरतुल्या सदा ||

## Certificate

This is to certify that Mr./Mrs./Prof./Dr. Ramesh Eknath Bharudkar of Arts, Commerce & Science College, Ashti, Dist-Beed has Participated /Chaired a session / as a Resource Person/ Presented a paper on महिला सक्षमीकरण आणि महिलांचा राजकीय सहभाग in One Day National Level Seminar on **Gender Equality and Women Empowerment** sponsored by Maharashtra State Commission for Women, Mumbai and organized by Nijampur-Jaitane Shikshan Prasarak Mandal's Adarsh College of Arts Nijampur-Jaitane, Tal-Sakri, Dist-Dhule (MS) held on 20 October, 2018

| | | | |
|---|---|---|---|
| **Prof. Atish S. Meshram** | **Dr. Priyanka Sulakhe** | **Prof. K.D. Sonawane** | **Dr. Ashok P. Khairnar** |
| Organizing Secretary | Co-ordinator | Joint Organizing Secretary | Principal and Convenor |

Rudra Creations 9823724705

2020-21

978-81-948515-7-8

# स्वराज्य ते लोकशाही : एक चिंतन

संपादक

डॉ. विठ्ठल जाधव

डॉ. रमेश लांडगे

प्रा. विठ्ठल गुंडे

Shaurya Publication, Latur

**© Copyright, 2019, Authors**

All rights reserved. No part of this publication may be reproduced or transmitted in any form or by any means, electronic or mechanical, including photocopy recording, or any information storage or retrieval system, without permission in writing from the publisher.

The opinions/ contents expressed in this book are solely of the author and do not represent the opinions/ standings/ thoughts of Publications Name. No responsibility or liability is assumed by the publisher for any injury damage or financial loss sustained to persons or property form the use of the information, personal or otherwise, either directly or indirectly. While every effort has been made to ensure reliability and accuracy of the information within, all liability, negligence or otherwise, form any use , misuses or abuse of the operation of any methods, strategies, instructions or ideas contained in the material herein is the sole responsibility of the reader. Any copyrights not held by publisher are owned by their respective authors. All information is generalized, presented informational purposes only and presented "as is" without warranty or guarantee of any kind.

All trademarks and brands referred to in this book are for illustrative purposes only, are the property of their respective owners and not affiliated with this publication in any way. Any trademarks are being used without permission and the publication of the trademark is not authorized by associated with or sponsored by the trade mark owner.

**ISBN:** 978-81-948515-7-8

Price: 250/-

Publishing Year 2021

*Published and Printed by:*

**Shaurya Publications**

Office Address: Kapil Nagar,

Khadgaon Roda, Latur- 413512

Email- hitechresearch11@gmail.com

# Index

1. Dr. B.R. Ambedkar: A Symbol of Knowledge to Down Trodden 111
Dr. D.V. Prasad
2. Dr. B.R. Ambedkar's Philosophy Of Education
Dr. Rajesh Shriniwas Shesham
3. Dr. Babasaheb Ambedkar's Contribution to Water Resource Development in India : Geographical Study
Dr. Ghodke .J.V.
4. डॉ. बाबासाहेब आंबेडकर महिला सशक्तीकरण
संशोधक : रमा त्रिबंक शेजुळ
5. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महिला सक्षमीकरण
प्रा. डॉ. अशोक नारायण गायकवाड
6. डॉ.बाबासाहेब आंबेडकर : भारतीय कृषी विकास
प्रा.डॉ.आचार्य आर.डी.
7. डॉ.बाबासाहेब आंबेडकर : शैक्षणिक धोरण आणि अस्पृश्य समुह.
अनंत कराड.
8. डॉ. बाबासाहेब आंबेडकर : सामाजिक न्याय
सहयोगी प्रा.इंगळे के.एम.
9. डॉ. बाबासाहेब आंबेडकर - अर्थशास्त्रज्ञ
डॉ. संदिप अर्जुनराव बनसोडे, शीला विठ्ठलराव डोंगरे
10. आजच्या समकालीन परिप्रेक्ष्यात डॉ. आंबेडकरांच्या लोकशाही विचाराची उपयुक्तता
डॉ. अभिषेक चिमणकर
11. डॉ. बाबासाहेब आंबेडकर: भारतीय कृषी विकास
प्रा. भारुडकर रमेश एकनाथ
12. डॉ. बाबासाहेब आंबेडकर: महिला सशक्तिकरण
डॉ. संदीप अ बनसोडे
13. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषीविषयक विचार

978-81-948515-7-8

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर: भारतीय कृषी विकास

प्रा. भारुडकर रमेश एकनाथ
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,अॅड. बी. डी. हंबर्डे महाविद्यालय आष्टी.

---

**प्रस्तावना :-**

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये कृषी क्षेत्राचा महत्वाचा वाटा आहे. कृषी क्षेत्र हे भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. प्राचीन काळापासूनच भारतीय लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हाच राहिलेला आहे. त्यामुळे भारताची ओळख कृषी प्रधान देश अशी बनलेली आहे. प्राचीन काळात विशेषत: वैदिक काळात वैश्य वर्णीयांकडे व्यापार व कृषी विषयक कार्य सोपवलेलेआढळते. प्राचीन-मध्ययुग व ब्रिटीश काळात शासन व्यवस्थेच्या उत्पन्नाचे प्रमुखस्त्रोत जमीन महसूल हेच राहिलेले दिसून येते. त्यामुळे बहुतांश राज्यकर्त्यांनी अतिरिक्त शेतसारा भारतीय जनतेकडून वसूल केल्याचे आढळते. त्यामुळे भारतीयशेती व शेतकरी यांची विपन्नावस्था झाल्याचे दिसून येते. भारतीय शेती वशेतकऱ्यांच्या हितासाठी मूलगामी योजना आखून त्या प्रत्यक्ष कृतीत आणण्याचे कार्य करणाऱ्यांमध्ये मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्थान अग्रभागी आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, अर्थशास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, राजनीतितज्ञ, दलितांचे कैवारी, व आधुनिक भारताचे राष्ट्र निर्माते एक प्रखर बुद्धीप्रामाण्यवादी व कृतीशील विचारवंत म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ओळखले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताचा इतिहास, समाजशास्त्र, धर्मशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, व सांस्कृती यांची बुद्धीप्रामाण्यवादी भूमिकेतून पुनर्मांडणी केली. प्रस्तूत शोध निबंधात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कृषी विषयक कृषिविषयक विचारांचा त्यांनी कृषी विकासासाठी केलेल्या उपाय योजनांचा व धोरणांचा एतिहासिक दृष्टीकोनातून विश्लेषण करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषी विषयक धोरण आणि त्याच्या समस्येवरील उपाय :-**

**१. शेतकरी वर्गाचे हितचिंतक :-** डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित समाजाच्या हक्कांसाठी तर लढा दिलाच तसेच शेतकरी वर्गावर होणाऱ्या अन्यायाचीही त्यांना जान होती त्यांच्या न्यायासाठी आपण लढले पाहिजे असे त्यांना वाटे व त्यासाठी ते सज्ज झाले. त्यांनी इ.स. १९१८ मध्ये भारतातील शेती क्षेत्रासमोरील समस्याचे मूलगामी विश्लेषण Small Holdings in Indiaand their remediesया शोध निबंधात केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांचा पहिला संप घडून आला होता. हा संप १९२८ - १९३४ या दरम्यान रायगड जिल्ह्यातील चरी या गावी झाला. हा संप तब्बल सात वर्ष चालला. गरिब दरिद्री शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी १९२८ पासूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न हाती घेतले होते. शेतकऱ्यांच्या अनेक सभांमध्ये त्यांनी मार्गदर्शन करून शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडली. विशेष म्हणजे हे शेतकरी कुणबी, मराठा, मुसलमान होते. बाबासाहेबांनी शेतकऱ्यांच्या जातीचा विचार न करता सर्व जातिधर्माच्या शेतकऱ्यांसाठी चळवळ उभारली होती.

**२. शेतीचे तुकडीकरणाची समस्या व उपाय:-** इ.स. १९१८ मध्ये डॉ. आंबेडकर यांनी भारतातील शेती क्षेत्रासमोरील समस्याचे मूलगामी विश्लेषण Small Holdings in Indiaand their remediesया शोध निबंधात केले. भारतामध्ये संततीनियमन अभावी वाढती लोकसंख्या व त्यामुळे शेतीचे तुकडीकरण होऊन धारणा क्षेत्र लहान बनल्यामुळे जमीन मोठया प्रमाणात पडीक बनली. त्याचा परिणाम भारतात बेरोजगारी वाढून अन्न-धान्य उत्पादन घटण्यात झाला. त्यामुळे भारताचे राष्ट्रीय उत्पन्न घटले व दारिद्र्य वाढले. भारतीय शेतीच्या या तुकडीकरणावर उपाय त्यांनी सांगीतलेला आहे. ते म्हणतात शेतकऱ्यांनी आपली मुले शेतीवर अवलंबून न ठेवता त्यांना व्यापार, उद्योग, व शिक्षण क्षेत्रात घातले पाहिजे त्यामुळे शेतीवरचा बोजा कमी होईल.ग्रामीण भागात विखुरलेला समाज एकसंघ करायचा तर शेतीचे चित्रच बदलले पाहिजे याबाबत डॉ. आंबेडकर आग्रही होते. भारतीय शेतीची उत्पादकता व कस अमेरीका देशातील शेतीच्या तुलनेत नगण्य आहे. भारतीय उत्पादन वाढवण्याचा मार्ग हा जमिनीचे आकारमान वाढवने हा नसून असलेल्या शेतजमिनीत मोठया प्रमाणात भांडवल, मनुष्यबळ व तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पन्न वाढवने हा आहे. शेतीच्या सलगीकरणासाठी व उत्पादकता वाढवण्यासाठी सहकारी शेती हा सवोत्कृष्ट मार्ग आहे.

**३. खोती पद्धतीचे निर्मूलन :-** १४ एप्रिल १९२९ रोजी चिपळूण येथील रत्नागिरी जिल्हा शेतकरी परिषदेच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब होते आणि तिथे त्यांनी खोती पद्धतीवर प्रथमतः तोफा डागल्या. ते शेतकऱ्यांना उद्देशून म्हणाले, "मला तुमच्या व्यथा व गाऱ्हाणी ठाऊक आहेत. खोती पद्धतीमुळे तुमचे रक्त शोषले जात आहे. खोतीची जमिन अधिकार पद्धत हि रद्दबातल करायलाच हवी. तरच तुम्हाला शांतता लाभेल आणि प्रगती साधता येईल. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी तुम्हाला सतत आंदोलन करावे लागेल... यासाठी विधिमंडळात तुमचा लोकप्रतिनिधी असणारा सदस्य हा योग्य लायकीचा असायला हवा. म्हणून सदस्य निवडून देताना तुम्ही काळजीपूर्वक मतदान केले पाहिजे, जो खोती पद्धत रद्दबातल करण्यासाठी मनःपूर्वक चिकाटीने संघर्ष करेल." डॉ. आंबेडकर यांनी स्वतंत्र मजूर पक्षातर्फे मुंबई विधिमंडळात जमीन मालक असणाऱ्या खोता विरोधात १७ सप्टेंबर १९३७ साली विधेयक मांडून जनआंदोलन उभारले होते. १० जानेवारी १९३८ रोजी २५००० शेतकऱ्यांचा मोर्चा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली विधिमंडळावर नेण्यात आला. त्याचा परिणाम कुळकायदा मंजूर होण्यात झाला. शेती हे केवळ उपजीविकेचे साधन नसून राष्ट्रीय उत्पन्नाचा स्त्रोत आहे. ग्रामीण भारताच्या विकासाचा आर्थिक विकासाचा केंद्रबिंदू आहे. शेतकऱ्यांबरोबरच अनेक शेत मजुरांना रोजगार देण्याचे माध्यम आहे. त्यामुळे शेतीकडे उद्योग म्हणून पहिले पाहिजे. सरकारकडून पुरेसे आवश्यक पाठबळ मिळत नसल्याकारणाने शेतकऱ्यांना सावकारांकडून जादा व्याज दराने कर्जे घ्यावी लागतात. त्यातून त्यांची अत्तापार्यंत सुटका होत नाही. सावकार व खोत यांना ते "आयत्या बिळावरचे नागोबा"असे म्हणतात. आर्थिक विषमता ही जातीय व्यवस्थेला पूरक व पोषक ठरते. त्यामुळे आर्थिक विषमतेची दरी कमी करण्यात शेती उद्योग महत्वाचे योगदान देईल असा विश्वास ते व्यक्त करतात. शासनाने पीकपद्धती, पाण्याची उपलब्धता, बांधबंधीस्ती, साठवण व्यवस्था, शेती मालाची विक्री व भाव याबाबत स्पष्ट नियम करावेत. हि भूमिका मांडली आहे. जलसंसाधन

विकासासाठी पिण्यासाठी, शेतीसाठी, जलवाहतूक, वीजनिर्मिती व काही पाणी उद्योगांसाठी असा सिंचय योजनांचा बहुउद्देशीय दृष्टीकोन असला पाहिजे.

भारतीय अर्थव्यवस्था पूर्णतः शेतीवर अवलंबून आहे. आणि मोठा भूमिहीन श्रमिक वर्गही देशात आहे, तेव्हा ही सगळी स्रामक उर्जा शेतीकडून उद्योगांकडे वळवायला हवी, याचेही त्यांनी जोरदार समर्थन केले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हि औधोगिकरण आणि आधुनिक आर्थिक विकासाची योग्य सांगड घातली होती व औद्योगिकरण अधिक गतिमान व्हाव या मताचे ते पुरस्कर्ते होते. अतिरिक्त स्रामिकवर्ग बिगर शेती व्यवस्था व्यवस्थांकडे वळवल्यास शेत जमिनींवर अवलंबून असलेले आर्थिक अधिमुल्यही कमी होईल. भारतीय शेतकऱ्यांनी स्व – विकासासाठी जाती– पातीसोडून शेतकरी म्हणून एकत्रित या व संघटीत व्हा! असा मूलमंत्र देणारे शेतकऱ्यांचे नेते म्हणून देखील डॉ. आंबेडकर यांचे कार्य महत्वाचे आहे.

**४. जमिन महसूल व आयकर यातील विषमता :-**

शेतीतून मिळणारे उत्पन्न अवर्षनामुळे कमी झाले काय किंवा भरघोस उत्पन्न झाल्यामुळे वाढले काय, प्रत्येक शेतकऱ्याला आपल्या जमिनीच्या प्रमाणात शेतसारा भरावाच लागतो. त्यातून सर्व शेतकऱ्यांना शेतसाऱ्याचा एकच दर लागू होतो, मग तो अल्प भूधारक असो अथवा जहागीरदार. मात्र याउलट आयकर (Income Tax) हा करदात्याच्या देय क्षमतेवर अवलंबून असतो. एखादया व्यक्तीला त्या वर्षात विशिष्ट मर्यादे पेक्षा कमी उत्पन्न झाले तर त्या व्यक्तीला आयकर भरावा लागत नाही. शेतकऱ्याबाबत मात्र असा निश्चित नियम नसल्याकारणाने जमीन महसुलाच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे शोषण होते. म्हणूनच महसूल व्यवस्था आर्थिक विषमतेला खतपाणी घालणारी आहे. म्हणून करभरणीच्या माध्यमातून येणाऱ्या पैशांचा उपयोग शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यासाठी केला पाहिजे अशी भूमिका ते मांडतात

**५ . नदया जोडप्रकल्प धोरणाचे जनक :-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर इ. स. १९४२ ते १९४६ या काळात केंद्रीय पाटबंधारे मंत्री असताना कृषी विकासासाठी पाणी पुरवठा करण्यासाठी देशातील मोठ्या नद्या जोडण्याचा विचार मांडून भाक्रा – नांगल प्रकल्पाची पायाभरणी केली. त्यासाठी अमेरीकेतील "युनायटेड स्टेट्स द ब्युरो ऑफ रेक्लमेशन"च्या तज्ज्ञ इंजिनियरांची मदत घेतली. या धरणाची उंची ४८७.६८ मीटर एवढी करून कमाल जलसाठा वाढवला. त्याचा फायदा हरितक्रांतीसाठी झाला. कृष्णा, गोदावरी आणि तापीच पाणी समुद्रात वाया जाऊ नये आणि या नद्या एकमेकांना जोडल्या जाव्यात असेही मत त्यांनी मांडले होते. त्याचबरोबर दामोदर, गंगा, महानदी, कोसी व ब्रह्मपुत्रा या नद्यांवर धरणे बांधण्याचा व वीज निर्मितीचा प्रकल्प हाती घेतला. आज राज्यात व देशातही पाणी व वीज टंचाई वणवण करावी लागत आहे. याबाबत डॉ. आंबेडकरयांची दुरदृष्टी जाणवते.

**६ . कृषी विकासासाठी कल्याणकारी योजना :-**

केंद्रीय सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्रीअसतांना डॉ. बाबासाहेबांनी कृषी विकासासाठी काही योजना व प्रकल्पात पुढाकार घेतला. बंगाल आणि बिहारसाठी (ऑगस्ट १९४५) दामोदर व्हॅली हा बहुउद्देशीय प्रकल्प. या प्रकल्पाच्या विकासाचा उद्देश पुढील गोष्टींच्या निर्मितीसाठी होता १) ४७,००,००० एकर शेतीला नियंत्रित पाणीपुरवठा करणारा जलसाठा. २) ७,६०,००० एकर शेतीला बारमाही पाणीपुरवठा आणि जलमार्ग

३) ३,००,०००, किलोवॅट वीजनिर्मिती ४) ५० लाख नागरिकांना प्रत्यक्ष्य फायदा आणि लक्षावधी इतर नागरिकांना अप्रत्यक्ष्य फायदा. ओरिसामधील नद्यांचा विकास करण्यासाठी (नोव्हेंबर १९४५ ) बहूउद्देशीय योजना. या योजनेच्या विकासात धरणे - पाटबंधारे- जलमार्ग बांधून आणि स्वस्त वीजनिर्मिती करून राज्य संपन्न करणे, हा उद्देश होता. ३ जानेवारी १९४५ रोजी केंद्र बिहार आणि बंगाल सरकारातील प्रतिनिधींची संयुक्त सभा कलकत्यात घेण्यात आली. या सभेत पूर नियंत्रणाच्या मुद्यावर बाबासाहेबांनी भाषण दिले. १९४५ मध्ये दामोदर नदीला पूर आला होता. त्याच्या परिणामस्वरूप दामोदर प्रकल्प स्थापण्यात आला होता. अमेरिकेतील टेनेसी खोरे प्रकल्पाच्या आधारे बाबासाहेबांनी त्यांची योजना तयार केली होती. ओरिसातील हिराकुंड धरणाच्या नियोजनातही बाबासाहेबांचा समावेश होता.

"भारताच्या विकासात मोठया धरणांची भूमिका" हि संकल्पना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सादर केली.या बहुउद्देशीय प्रकल्पात पाटबंधारे, वीजनिर्मिती आणि जलवाहतूक यांचा समावेश करण्यात आला होता. डॉ. आंबेडकरांनी प्रथम प्रादेशिक पॉवरग्रिडची संकल्पना मांडली. त्यांच्यापुढाकारातूनच प्रादेशिक पॉवरग्रिड विस्तार होऊन राष्ट्रीय पॉवरग्रिड निर्मितीला प्रारंभ होऊन केंद्रात ऊर्जा पुरवठा विभाग सुरू झाला. सेन्ट्रल इलेक्ट्रिसिटी ऑथॉरीटी (Central Electricity Authority) व केंद्रीय जल आयोग (CentralWater Commission) च्या निर्मितीत डॉ. आंबेडकर यांनी मांडलेली भूमिका महत्वाची ठरलेली दिसून येते. केंद्र सरकारने विद्युत निर्मिती आणि पुरवठा या क्षेत्रात थेट सहभागी होण्याचा पर्याय ठेवावा, याबाबत ते आग्रही होते. भारताच्या कृषी व औद्योगिक वि कासासाठी स्वस्त आणि अमर्यादित विद्युत पुरवठ्याची गरज त्यांनी व्यक्त केली होती. त्यासाठी केंद्र सरकारने ऊर्जा प्रकल्प राबवावेत अशी भूमिका त्यांनी वेळोवेळी आपल्या भाषणांतून व लेखनातून केली आहे. औद्योगिक क्रांतीसाठी देखील शेतमालाची आवश्यकता असते. वास्तव आहे. त्यामुळे शासनाने कृषी विषयक धोरणांकडे विशेष लक्ष देऊन स्थलांतरितांचा प्रश्न सोडवला पाहिजे. त्यांचा हा विचार आजच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेला दिशा देणारा आहे. यावरून त्याचे द्रष्टेपण स्पष्ट होते.

**निष्कर्ष :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारताच्या आर्थिक नियोजनाचे आणि आर्थिक विकासात्मक धोरणाचेही शिल्पकार होते. त्यांना भारतीय कृषी व्यवस्थेची देखील चांगली जाण होती. सामूहीक शेतीचे ते पुरस्कर्ते होते. भारतासारख्या कृषिप्रधान देशात पाणी आणि वीज यांचा समानरीत्या पुरवठा झाला, तर भारत एक समृद्धी देश होण्यास वेळ लागणार नाही असे त्यांचे मत होते. खोती पध्दत ही एक प्रकारची आर्थिक शोषण करणारी व्यवस्थाच होती. ही खोती पध्दत नष्ट करणारे कायदे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. ज्याप्रमाणे रेल्वेमार्गावर पूर्णपणे केंद्र केंद्र शासनाची मालकी असते, त्याप्रमाणे जालमार्गावर देखील केंद्र शासनाचीच मालकी असावी असे मत त्यांनी मांडले. ग्रामीण भागात विखुरलेला समाज एकसंध करायचा, तर शेतीचे चित्र बदलले पाहिजे, याबाबत ते आग्रही होते. भारतात सर्व प्रथम नदी जोड प्रकल्प योजना मांडण्यात व हिराकूड, भाक्रा - नांगल प्रकल्प उभारणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान महत्वाचे असल्याचे दिसते.त्यांचे ग्रामीण समाज आणि शेतीबाबतचे विचार आजही राज्यकर्ते, नियोजनकार आणि शेतक-यांसाठी मार्गदर्शक ठरणारेआहेत. या पार्श्वभूमीवर

डॉ. बाबासाहेब यांच्या शेतीविषयक सूचनांची अंमलबजावणी केली, तर शेती व ग्रामीण भागाचे परिवर्तन घडेल. राज्यात होत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या, शेतीसामोरचे प्रश्न यांचा विचार केला, तर आजही या प्रकाश यात्रीचे स्मरण प्रेरणादायी ठरणारे आहे.

**संदर्भग्रंथ सूची**


१. प्रज्ञासूर्य डॉ. आंबेडकर समग्र वैचारिक चरित्र - डॉ. नरेंद्र जाधव

२. जाधव नरेंद्र, (सांपा.) बोल महामानवाचे खंड १, पृष्ठ क्र. १३

३. गाठाळ साहेबराव, आंबेडकरी चळवळीचा इतिहास कैलास प्रकाशन, औरंगाबाद, २०१०, पृष्ठ क्र. ३७२-३८०

६. फडके य. दि., आंबेडकरी चळवळ, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९९०, पृष्ठ क्र. १४३

७. Dr. Babasaheb Ambedkar Writing and Speeches Vol.10 pageno. 284-290.

८. Dr. Babasaheb Ambedkar Writing and Speeches Vol. 2 pageno. 1-5.

९. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे खंड १७, महाराष्ट्र राज्य शासन प्रकाशित पृष्ठ क्र. २१२

१०. दैनिक सकाळ ४ ऑक्टोबर २०१५

११. Dr. Babasaheb Ambedkar Writing and Speeches, Vol.10. Pageno. 302-311.

१२. जाधव नरेंद्र, (सांपा.) बोल महामानवाचे खंड ३, पृष्ठ क्र. ३४८

१३. जाधव नरेंद्र, (सांपा.) उपरोक्तपृष्ठ क्र. ३७०-३७१